माहितीचा अधिकार

महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(CIN No. U40109MH2005SGC153646)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कार्यालयाचे नांव :- अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल, कराड
कार्यालयाचा पत्ता :- प्रशासकीय इमारत, विजयनगर, ता. कराड, जि. सातारा- ४१५ ११४
दुरध्वनी क्रमांक :- (का) ०२१६४-२५५११६ (वै) ०२१६४-२५५१२७ (फॅक्स) ०२१६४-२५५१५१
ई-मेल :-se3100@mahatransco.inवेबसाईट :-www.mahatransco.in

जा.क्र. अअ/अउदा संवसु मंडल/कराड/मासं/ 0552 दि. 26 APR 2022

**शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ अंतर्गत सत्र २०२१-२२ करीता निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी तथा प्रतिक्षा यादी.**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री व्यवसायात उत्तीर्ण पात्र उमेदवारांकडून ४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग, कराड करीता एकूण ७ जागांकरीता ऑनलाईन अर्ज (Apprenticeship Portal) मागविण्यात आले होते. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख ११.११.२०२१ होती.

२. वैध अर्ज असलेल्या पात्र उमेदवारांची त्यांच्या एस.एस.सी. तसेच आय.टी.आय (विजतंत्री) एकत्रित टक्केवारीच्या सरासरीच्या आधारावर तसेच उमेदवारांच्या अर्जामध्ये असलेल्या माहितीनुसार प्रवर्गनिहाय सामाजिक आरक्षणाच्या आधारे तात्पुरती निवड तथा प्रतिक्षा यादी तयार करणेत आलेली आहे.

३. ज्या दोन किंवा अधिक उमेदवारांची एकत्रित गुणांची टक्केवारी समान आहे, अशा उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवून वयाच्या जेष्ठतेनुसार क्रमवारी लावण्यात आली.

४. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून शिकाऊ उमेदवारीकरीता उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. तात्पुरती निवड यादी ही उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग, व इतर अटी-शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून आहे. त्यामुळे जर उमेदवार शिकाऊ उमेदवार म्हणून निवड होण्यासाठीची पात्रता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तीचा भंग होत असल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी / निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. तात्पुरती निवड झालेल्या सर्व उमेदवारांना कागदपत्र पडताळणीच्या वेळेस शैक्षणिक पात्रतेसंबंधी गुणपत्रिका /प्रमाणपत्रे, सामाजिक आरक्षणाकरीता ज्या प्रवर्गातून अर्ज सादर केलेला आहे त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, ज्या प्रवर्गाकरीता प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र आवश्यक आहे, त्या प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे (नॉनक्रिमीलेअर) दि. ३१.०३.२०२२ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील उमेदवारांना ई. डब्लू. एस. प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, इत्यादी मुळ प्रमाणपत्रे व सर्व कागदपत्रांची साक्षांकीत झेरॉक्स प्रत सोबत आणने आवश्यक आहे. जर उमेदवार कागदपत्र पडताळणीच्या वेळेस वरीलपैकी मुळ प्रमाणपत्रे दर्शविण्यात असमर्थ ठरल्यास किंवा मुळ प्रमाणपत्र व अर्जासह जोडलेल्या प्रमाणपत्रांमध्ये तफावत आढळल्यास संबंधित उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

६. तात्पुरती निवड झालेल्या उमेदवारांपैकी कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरल्याने, कागदपत्र पडताळणी करीता विहीत मुदतीत हजर न झाल्याने, अथवा कागदपत्र पडताळणीत पात्र ठरूनही दिलेल्या ठिकाणी विहीत मुदतीत रूजू न झाल्याने रिक्त असलेल्या जागांकरीता गुणवत्ता यादीतील क्रमवारीने प्रतिक्षा यादी आपोआपच कार्यान्वित होवून खुल्या तथा राखीव जागांकरिता प्रवर्गनिहाय उमेदवारांनी निवड तथा प्रतिक्षा यादी लावण्याचे अधिकार अउदा संवसु मंडल, कराड राखुन ठेवत आहे.

७. तात्पुरती निवड तथा प्रतिक्षा यादी तयार करतांना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामूळे झालेल्या चुका सुधारीत करून योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार अउदा संवसु मंडल, कराड राखून ठेवत आहे.

पान २ वर...

८. निवड न झालेल्या व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचे फोन, ईमेल किंवा पत्रव्यवहार अउदा संवसु मंडल, कराड कार्यालयाकडे करू नये. उमेदवारांच्या कोणत्याही ईमेल किंवा पत्रव्यवहाराची या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९. निवड यादीतील तसेच प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी दि. ०४.०५.२०२२ रोजी ***"कार्यकारी अभियंता, महापारेषण, ४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग, कराड यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, तळमजला, विजयनगर-मुंढे, ता. कराड, जि. सातारा- ४१५ ११४"*** या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत (सकाळी १०:०० ते सांय. ०६:१५) मुद्दा क्र ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मुळ कागदपत्रे (१ संच साक्षांकीत झेरॉक्स प्रतीसह) पडताळणी करीता हजर राहावे. तद्नंतर आलेल्या कोणत्याही उमेदवारांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

१०. सर्व उमेदवारांना स्वखर्चाने कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित राहावे लागेल.

## PROVISIONAL SELECT LIST

| Sr.No | Application Code | Name of candidate | Caste | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1 | AP1021386486 | SHUBHAM CHAITARAM MOTGHARE | OBC | Select against open |
| 2 | AP112109881 | SHAIKH ISMAIL SALIMABI | general | Select as open |
| 3 | AP112144266 | Raut Nikhil Ramrao | OBC | Select against open |
| 4 | AP1021386314 | Pandit Balaji Halgare | OBC | Select as OBC |
| 5 | AP1021384140 | Suraj surve | SC | Select as SC |
| 6 | AP1021387300 | Umesh Rajabhau Udhan | EWS | Select as EWS |
| 7 | AP1021384313 | Chavan Vishalkumar Devidas | VJ-A | Select as VJ A |

## PROVISIONAL WAITING LIST

| Sr. No | Application Code | Name of candidate | Caste | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1 | AP1021407303 | TEJAS ANANDA PANDE | OBC | Waiting against open/OBC |
| 2 | AP1021374264 | BHAGYASHRI DADARAO MUNDHE | OBC | Waiting against open |
| 3 | AP1021398209 | Lokesh Manohar Ingle | OBC | Waiting against open |
| 4 | AP112114999 | Nitesh Prakash Manvar | SC | Waiting against SC |
| 5 | AP1021402587 | AKSHAY ROHIDAS CHAVHAN | VJ-A | Waiting against VJ A |
| 6 | AP1021372282 | HARISH UDAY NALAWADE | EWS | Waiting against EWS |

(श्री. चि.लिं. कोळी)
अधीक्षक अभियंता
अउदा संवसु मंडल, कराड.